04 FEB 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'हवामान बदल' विभाग करणार महापुराचा अभ्यास

## शासनाला सूचना सादर करणार : कृष्णा पूर नियंत्रण समितीचे सहकार्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सांगली येथील कृष्णा महापूर नियंत्रण समितीने शिवाजी विद्यापीठाला मंगळवारी महापुराची कारणे आणि उपाययोजना याबाबतची संकलित केलेली माहिती सादर केली. त्याचा अभ्यास विद्यापीठातील हवामान बदल विभाग करणार आहे. त्यानंतर या समितीच्या शिष्टमंडळासमवेत चर्चा करून महापूर नियंत्रणाबाबतच्या सूचना एकत्रितपणे राज्य शासनाला सादर करण्यात येणार आहेत.

या समितीच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत, हवामान बदल विभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांच्यासमवेत चर्चा केली. या समितीने कृष्णा नदीच्या महापुराबाबत काही माहिती संकलित केली आहे. त्याचा विद्यापीठाने अभ्यास करून राज्य शासनाला महापूर नियंत्रणाबाबत काही सूचना सादर करता येईल, या उद्देशाने समितीने कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेतली असल्याचे अधिसभा सदस्य संजय परमने यांनी सांगितले. यावेळी चर्चेमध्ये हवामान बदल विभाग दि. १५ मार्चपर्यंत समितीच्या माहितीवर अभ्यास करणार आहे. त्यानंतर दि. १५ एप्रिलला पुन्हा बैठक घेऊन चर्चा करून महापूर नियंत्रणाबाबत मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शासनाला सूचना सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी समितीतील हणमंत पवार, विजयकुमार दिवाण, प्रभाकर केंगार, प्रदीप वायचळ, शैलेश पवार, नीलेश पवार, संजय कोरे उपस्थित होते.



कोल्हापुरात मंगळवारी कृष्णा पूर नियंत्रण समितीच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत चर्चा केली. यावेळी संजय परमने, पी. एस. पाटील, आर. के. कामत, आदी उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

### समितीने सादर केलेली माहिती

कृष्णा नदीवरील बांधकामे, केंद्रीय जलआयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार धरणात पाणीसाठा न करणे, राजापूर बंधारा ते अलमट्टी धरणापर्यंत नदीचा नैसर्गिक उतार अत्यंत कमी असणे ही महापुराची कारणे समितीने विद्यापीठाला सादर केली. महाराष्ट्र, कर्नाटक राज्यात पूरनियंत्रणाबाबत सतत समन्वय असावा. पूर संरक्षक समिती गठीत करावी. अशा विविध १९ सूचनांची माहिती दिली आहे.

04 FEB 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कृष्णा पूरनियंत्रण'तर्फे कुलगुरूंकडे अहवाल

## सांगली, कोल्हापुरातील महापुराची कारणे व उपायांची दिली माहिती

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

कृष्णा पूरनियंत्रण कृती समितीच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना 'पुराची कारणे व उपाय योजना' याबद्दलचा सविस्तर अहवाल देण्यात आला.

कुलगुरू यांना दिलेल्या अहवालात म्हटले आहे की, २००५ पूर्वी किमान चारवेळा तरी कृष्णा नदीस महापूर येऊन गेला आहे. त्यावेळी सांगली व कोल्हापूर शहरात १ ते २ दिवसच पाणी साठून राहिले होते. मात्र, २००५ नंतर अलमट्टी धरणात पूर्ण क्षमतेने म्हणजे ५१९.६० मीटरपर्यंत पाण्याची साठवण सुरू झाली. त्यामुळे अलमट्टी-हिप्परगी धरणाच्या पाणी साठ्याचा फुगवटा सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात होत आहे.

केंद्रीय जल आयोगाने धरणात पाण्याची साठवण आणि विसर्ग यांच्या घालून दिलेल्या नियमांचे पालन होत नाही. त्यामुळे पुराचा फटका बसतो आहे. उपनद्या, नाले, ओढे यांच्यावरती अतिक्रमण, पूल, बंधारे यांचे जलशास्त्रीय दृष्टिकोनातून बांधकाम न करणे, जागतिक तापमान वाढीमुळे अनियमित व अतिवृष्टी होणे यांचा अचूक अंदाज न येणे अशी विविध कारणे पुरास कारणीभूत आहेत. त्यामुळे केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार धरणातील पाणीसाठ्याचे काटेकोर पालन होणे गरजेचे आहे. अलमट्टी धरणाची पाणी पातळी १ सप्टेंबरपर्यंत ५१६ मीटरपेक्षा जास्त ठेवू नये, असे विविध उपाय यामध्ये सूचविण्यात आले आहेत. सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता विजयकुमार दिवाण, सेवानिवृत्त अभियंता प्रदीप वायचळ, अभियंता प्रभाकर केंगार, विद्यापीठचे सिनेटर मेंबर संजय परमणे, माजी स्थायी सभापती हणमंत पवार, संजय कोरे उपस्थित होते.

0 4 FEB 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांचीसुद्धा ॲकॅडमी स्वतंत्र स्थापन करावी : डॉ. शिर्के

## न्यू एज्युकेशन सोसायटीचा १०१ वा वर्धापन दिन

कोल्हापूर, ता. ३ : "संस्था चालकांनी १०० वर्षांपूर्वी शिक्षण, शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे ओळखून संस्था स्थापन केली. कोणत्याही व्यक्तीने वाढदिवस केला तर त्याचे आयुष्य वर्षाने कमी होते; परंतु संस्थेने वाढदिवस साजरा केला तर संस्थेचे आयुष्य वाढते. संस्थेने जशी क्रीडा ॲकॅडमी केली तशीच शिक्षकांच्या विचारधारेस, नवनवीन बदलांचा विचार करण्यासाठी शिक्षकांची ॲकॅडमीक ॲकॅडमी स्थापन करावी," असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

दि न्यू एज्युकेशन सोसायटीचा १०१ वा वर्धापन दिन संस्थेच्या राम गणेश गडकरी सभागृहात झाला. मान्यवरांच्या उपस्थित ध्वजवंदन झाले. गणेश वंदना, संबलपुरी लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य आविष्कार स. म. लोहिया हायस्कूल, प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे सादर केली.



कोल्हापूर : दीपप्रज्वलन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डावीकडून प्राचार्य एस. एस. चव्हाण, नेमचंद संघवी, अनिल लोहिया, विजय मेनन, पद्माकर सप्रे, नितीन वाडीकर, प्रभाकर हेरवाडे.

मेनन ॲण्ड मेननचे व्यवस्थापकीय संचालक विजय मेनन, सोसायटीचे अध्यक्ष पद्माकर सप्रे, विश्‍वस्थ मंडळाचे अध्यक्ष अनिल लोहिया, नियामक मंडळाचे अध्यक्ष निर्मल लोहिया, उपाध्यक्ष नितीन वाडीकर, सदस्य नेमचंद संघवी, कुशल सामाणी, राजेश लोहिया, उत्कर्षा पाटील, अनिता सूर्यवंशी सचिव प्राचार्य प्रभाकर हेरवाडे, प्राचार्य एस. एस. चव्हाण, सयाजी पाटील, उमा भेंडीगरी, प्रदीप पोवार उपस्थित होते. श्री. वाडीकर यांनी प्रास्ताविक केले. विविध शाळांमध्ये सेवा निवृत्त झालेल्या १२ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच १० वी, १२ वी मार्च २०२१ परिक्षेतील विशेष गुणवत्ता प्राप्त स्कॉलरशिप परिक्षेत प्राविण्य मिळवलेले, बेस्ट एनसीसी. कॅडेटचा सत्कार स्मृतिचिन्ह, रोख बक्षीस देऊन केला.

प्राचार्य हेरवाडे यांनी आभार मानले. वर्षा देशपांडे, श्रीमती स्नेहा फडणीस यांनी सूत्रसंचालन केले.

0 4 FEB 2022

**तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आविष्कार संशोधन महोत्सव ऑनलाईन

## ९ फेब्रुवारीपर्यंत नावनोंदणी करण्याचे शिवाजी विद्यापीठाचे आवाहन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे 'आविष्कार संशोधन महोत्सव २०२१-२२'चे आयोजन केले आहे. महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक संशोधन सादर करू शकतात. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा महोत्सव ऑनलाईन होणार आहे. विद्यार्थी, प्राध्यापकांनी ९ फेब्रुवारीपर्यंत नावनोंदणी करावी, असे आवान समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक यांनी केले आहे.

अविष्कार संशोधन महोत्सवात चार स्तरामध्ये सहभाग नोंदवू शकतात. पदवी पदव्युत्तर, एमफिल., पीएचडीसाठी प्रवेशित असणारे विद्यार्थी आणि एमफिल, पीएचडीसाठी प्रवेशित असणारे महाविद्यालयीन व विद्यापीठीय मान्यताप्राप्त शिक्षक सहभाग नोंदवू शकतात. संशोधन प्रकल्पांची विभागणी सहा शाखांमध्ये आहे. मानव्यविद्या, भाषा, ललितकला, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, केवल विज्ञान, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यक व औषध निर्माण. विद्यार्थी, शिक्षक यांची कोणतीही शाखा असली तरी ते अन्य शाखेअंतर्गतही संशोधन सादर करू शकतात. पदवीस्तरासाठी प्रथम फेरी जिल्हास्तरावर होईल.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी ही फेरी न्यू कॉलेज (कोल्हापूर), विलिंग्डन कॉलेज (सांगली) व दहिवडी कॉलेज (दहिवडी) या महाविद्यालयांमार्फत होतील.

### तीन ते पाच मिनिटांचा व्हिडिओ अपलोड करावा

नोंदणी करताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रकल्पाची एक पानी संक्षिप्त माहिती **(PDF format)** आणि प्रकल्प सादरीकरणाचा ३ ते ५ मिनिटांचा मर्यादेचा व्हिडिओ अपलोड करणे आवश्यक आहे. एक पानी माहिती व व्हिडिओमध्ये विद्यार्थ्यांच्या अगर त्यांच्या महाविद्यालयाच्या, अधिविभागाच्या नावाचा उल्लेख नसावा. नोंदणीसाठीची लिंक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **(unishivaji.ac.in/bcud/Avishkar)** उपलब्ध कली जाणार आहे.



### महाविद्यालयांनी नोंदणी करावी

महोत्सवामध्ये एका महाविद्यालयातून, अधिविभागातून प्रत्येक शाखेसाठी व प्रत्येक स्तरामध्ये जास्तीतजास्त दोन विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. त्यांची नोंदणी संबंधित महाविद्यालय,अधिविभागांनी विद्यापीठाच्या गुगल फॉर्मच्या माध्यमातून ई-मेलद्वारेच करायची आहे. विद्यार्थी वैयक्तिक नोंदणी करू शकत नाहीत.

0 4 FEB 2022
पुण्यनगरी

जनसंपर्क क...
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा यंदाचा आविष्कार महोत्सव ऑनलाईन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामार्फत आविष्कार संशोधन महोत्सव २०२१-२२ चे आयोजन करण्यात आले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वर्षी हा महोत्सव ऑनलाईन माध्यमातून घेण्यात येणार आहे. नोंदणी करण्याची अंतिम मुदत दि. ९ फेब्रुवारी आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक यांनी दिली.

डॉ. महाडिक म्हणाले, महोत्सवात सहभागाचे चार स्तर आहेत. यामध्ये पदवी, पदव्युत्तर, एम.फिल., पीएच.डी.साठी प्रवेशित असणारे विद्यार्थी आणि महाविद्यालयीन, विद्यापीठीय मान्यताप्राप्त शिक्षकांचा समावेश आहे. संशोधन प्रकल्पांची विभागणी सहा शाखांत करण्यात येणार आहे.

विद्यार्थी, शिक्षकांची कोणतीही शाखा असली तरी ते अन्य शाखेंतर्गतही संशोधन सादर करू शकतात. या महोत्सवामध्ये एका महाविद्यालयातून, अधिविभागातून प्रत्येक शाखेसाठी व प्रत्येक स्तरामध्ये दोन विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची नोंदणी विद्यापीठाने महाविद्यालयाला दिलेल्या अधिकृत ई-मेलद्वारेच करावयाची आहे.

महोत्सवात विद्यार्थी व शिक्षकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले आहे.

लोकमत

# आविष्कार संशोधन महोत्सव ऑनलाईन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामार्फत 'आविष्कार संशोधन महोत्सव २०२१-२२'चे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवामध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षकांना संशोधन सादर करता येईल. कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर यावर्षी हा महोत्सव ऑनलाईन माध्यमातून घेण्यात येणार आहे. त्यातील सहभागासाठी नोंदणी करण्याची अंतिम मुदत गुरुवार (दि. ९ फेब्रुवारी) आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक यांनी दिली.

पदवी स्तरासाठी प्रथम फेरी न्यू कॉलेज (कोल्हापूर), विलिंग्डन कॉलेज (सांगली), दहिवडी कॉलेज (सातारा) या यजमान महाविद्यालयांमार्फत आयोजित करण्यात आली आहे. प्रथम फेरीतून निवडलेल्या पदवी स्तरातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठस्तरीय फेरीचे आयोजन संगणकशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित केले आहे. इतर तीन स्तरांसाठी महोत्सव थेट विद्यापीठ पातळीवर संगणकशास्त्र अधिविभागातर्फे होईल.

0 4 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

# ‘विद्यार्थी विकास’ उभारणार यूथ होस्टेल

## ५०० विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था ; स्टुडंट कौन्सिल अध्यक्ष, सचिवास केबिन

**संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागाचे दूरशिक्षण केंद्राच्या परिसरात स्वतंत्र 'यूथ होस्टेल' साकारले जाणार आहे. ते पाचशे विद्यार्थ्यांसाठी असून, विद्यार्थ्यांच्या निधीतून त्याची उभारणी केली जाणार आहे. स्टुडंट कौन्सिलचा अध्यक्ष व सचिव यांना स्वतंत्र केबिन्स मिळणार आहेत.

विद्यापीठात सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांसह राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे होत असतात. स्पर्धेत सहभागी होणारे विद्यार्थी व खेळाडू यांची वसतिगृहात सोय केली जाते. त्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊन त्यांना गावी परतावे लागते अथवा नातेवाइकांकडे आसरा घ्यावा लागतो. परिषदा, चर्चासत्रांनिमित्त विद्यापीठात आलेल्या संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक व तज्ज्ञांना



> **“ विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र यूथ होस्टेलची आवश्यकता होती. विद्यापीठात विविध कार्यक्रमानिमित्त येणाऱ्या विद्यार्थ्यांना मुलांच्या वसतिगृहात ठेवले जात होते. त्याचा ताण वसतिगृहातील मुलांवर होता. तो आता कमी होणार आहे. विशेष म्हणजे सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये राहण्याची सोय उपलब्ध होईल.**
>
> **- प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव,** संचालक, विद्यार्थी विकास विभाग

विद्यापीठाच्या गेस्ट हाऊसमध्ये ठेवले जात असले तरी त्याला संख्येची मर्यादा आहे. विद्यार्थी विकास विभागाच्या होस्टेलमध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होणार आहे. त्यासाठी सुमारे सात कोटी खर्च केले जाणार आहेत.

होस्टेलमध्ये २५० बैठक व्यवस्थेचे सभागृह असणार आहे. सेंटर फॉर लीडरशिप व सेंटर फॉर करिअर अँड सायकॉलॉजिकल कौन्सिलिंगचे कार्यालय होस्टेलमध्ये असेल. बेटी बचाओ अभियान, युवा संसद, ऑर्गन डोनेशन अवेरनेससह सांस्कृतिक कार्यक्रमांचे येथे आयोजन केले जाणार आहे. वसतिगृहासाठी विद्यार्थ्यांतून निधी गोळा जमा केला जात आहे. दूरशिक्षण केंद्राच्या परिसरात वसतिगृहासाठी जागा निश्चित केली आहे. होस्टेलच्या डिझाईनचे काम सुरू असून, त्याच्या बांधकामास येत्या काही महिन्यांत सुरुवात होईल.

पुण्यनगरी

# डॉ. सरवदेंच्या 'बोलीविज्ञान'ला पुरस्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्रा. डॉ. औदुंबर सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान' या पुस्तकाला यंदाचा महाराष्ट्र शासनाचा नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा बुधवारी करण्यात आली. त्यामध्ये प्रौढ वाङ्मय, भाषाशास्त्र, व्याकरण या साहित्य प्रकारासाठीचा एक लाखांचा नरहर कुरुंदकर पुरस्कार 'बोलीविज्ञान' पुस्तकाला जाहीर झाला. पुरस्काराबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांनी डॉ. सरवदे यांचे अभिनंदन केले.

04 FEB 2022

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ.सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान'ला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार जाहीर

कोल्हापूर, ता.३(प्रतिनिधी)

..............................

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. औदुंबर सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान' या पुस्तकाला यंदाचा महाराष्ट्र शासनाचा नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. त्यामध्ये प्रौढ वाङ्मय-भाषाशास्त्र / व्याकरण या साहित्य प्रकारासाठीचा एक लाख रुपयांचा नरहर कुरुंदकर पुरस्कार 'बोलीविज्ञान' पुस्तकाला जाहीर झाला. कोल्हापूरच्या भाषा विकास संशोधन संस्थेतर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. या पुरस्काराबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ.रणधीर शिंदे, डॉ.नंदकुमार मोरे यांनी डॉ.सरवदे यांचे अभिनंदन केले आहे.

लोकमत

# अभ्यासक्रम बाकी असेल तरच वर्ग भरवण्याची सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** ज्या अभ्यासक्रमांचे सध्या अध्यापन सुरू आहे अथवा बाकी राहिला आहे, त्या अभ्यासक्रमाचे वर्ग कोरोनाच्या नियमांचे पालन करून ऑफलाईन भरवा. अभ्यासक्रम पूर्ण झाला असल्यास सुटी घ्या, अशी सूचना शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांना केली आहे. शासनाच्या दि. ७ जानेवारीच्या परिपत्रकानुसार महाविद्यालय, विद्यापीठातील विविध अधिविभागांमधील प्रत्यक्ष उपस्थितीला प्रतिबंध करण्यात आला होता. हे प्रतिबंध शिथिल करून प्रत्यक्ष अध्यापन सुरू करण्यास दि. २५ जानेवारीच्या पत्राद्वारे अनुमती देण्यात आली. ज्या अभ्यासक्रमांचे सध्या अध्यापन सुरू आहे, त्या वर्गातील अध्यापन प्रत्यक्ष उपस्थितीत करता येईल. प्रथम सत्रांच्या दि. २ मार्चपर्यंत आयोजित परीक्षा विद्यापीठाकडून ऑनलाईन होणार आहेत. सत्र समाप्ती आणि प्रारंभाबाबतच्या दि. ५ जानेवारीच्या परिपत्रकांमध्ये कोणताही बदल नाही. त्यानुसार कार्यवाही करण्याची सूचना विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयांना केली आहे. दरम्यान, महाविद्यालयांकडून सध्या पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन घेण्यात येत आहेत.

पुढारी

# प्रा. बाविस्कर यांचे उद्या ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे 'मीट द ऑथर' या उपक्रमांतर्गत प्रसिद्ध लेखक, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या सेंटर फॉर फ्रेंच अ‍ॅन्ड फॉरेन स्टडीज अधिविभागातील प्राध्यापक डॉ. शरद बाविस्कर यांचे व्याख्यान ५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले आहे.

तरूण भारत

# महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती अर्ज वर्ग करावेत

■ **समाज कल्याण सहायक आयुक्तांचे आवाहन**

कोल्हापूर : अनुसुचित प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे २०२१-२२ वर्षातील शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांनी सहायक समाज कल्याण कार्यालयाकडे वर्ग करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे. शिष्यवृत्ती भरण्याचे व प्राप्त अर्जावर महाविद्यालयांकडून संथगतीने कार्यवाही सुरु आहे. ज्या महाविद्यालयांचे अर्ज प्रलंबित आहेत अशा महाविद्यालयांनी अर्जतपासणी करून योग्य अर्ज सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडे वर्ग करावेत, विविध महाविद्यालयात प्रवेशित अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र सरकार शिष्यवृत्ती आणि शिक्षणशुल्क व परिक्षाशुल्क या योजनांचा लाभ दिला जातो. ज्या महाविद्यालयांची अर्ज नोंदणी कमी आहे, अशा महाविद्यालयांनी अर्जनोंदणीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करावे, असे पत्रकाव्दारे कळविले.